जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2025

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याहस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात संत रविदास महाराज यांची जयंती उत्साहात झाली. मुख्य प्रशासकीय इमारतीत संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे डॉ. अण्णासाहेब गुरव, डॉ. दीपा इंगवले, डॉ. तेजपाल मोहरेकर, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव उपस्थित होते.

14 FEB 2025 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**कोल्हापूर :** लोकोत्सव समितीने गुरुवारी विविध मागण्यांचे निवेदन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना दिले. शेजारी अन्य.

# महाराणी ताराराणींच्या जीवनावर आंतरराष्ट्रीय परिषद घेणार : डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता. १३ : महाराणी ताराबाई (ताराराणी) यांच्या ३५० व्या जयंती वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाने विविध कार्यक्रम आयोजित करावेत, अशी मागणी लोकोत्सव समितीने आज केली. त्यावर महाराणी ताराराणी यांच्या जीवन चरित्रावर आंतरराष्ट्रीय इतिहास परिषद घेतली जाईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

छत्रपती महाराणी ताराबाई ३५० वी जयंती वर्ष लोकोत्सव समितीच्या शिष्टमंडळाने विविध मागण्यांचे निवेदन कुलगुरू डॉ. शिर्के यांना दिले. त्यात विद्यापीठांमध्ये ताराराणी जीवन चरित्रावर राष्ट्रीय स्तरावर इतिहास परिषद व्हावी. त्यांचा इतिहास बी. ए., एम. ए. इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करावा आदी मागण्या केल्या. शिष्टमंडळाने कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याशी चर्चा केली. त्यात समितीचे निमंत्रक वसंतराव मुळीक, डी. आर. मोरे, विष्णू खाडे सहभागी झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. समितीच्या शिष्टमंडळात शशिकांत पाटील, विद्या साळोखे, अजित पाटील, अभिषेक मिठारी, महेश मछले, सोमनाथ घोडेराव, सी. एम. गायकवाड, प्रल्हाद जाखले, शिवाजी मोरे, राजू चव्हाण, शंकरराव शेळके, संयोगिता देसाई, प्रकाश पाटील, अजित इंगळे, राम तुपे, अनिल साळोखे, अवधूत पाटील आदींचा समावेश होता.

### समितीने केलेल्या अन्य मागण्या

विद्यापीठ संलग्न सर्व महाविद्यालयांमध्ये व्याख्याने आयोजित करावीत. विद्यापीठात सर्वोच्च गुण मिळवणाऱ्या विद्यार्थिनीला महाराणी ताराराणी पुरस्काराने सन्मानित करावे. विद्यापीठातील एका विद्यार्थिनी वसतिगृहास महाराणी ताराबाई यांचे नाव देण्याची मागणी लोकोत्सव समितीने केली.

14 FEB 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ताराराणींच्या जीवनावर आंतरराष्ट्रीय इतिहास परिषद

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आश्वासन : लोकोत्सव समितीच्यावतीने निवेदन

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापुरातील छत्रपती महाराणी ताराबाई ३५० वी जयंती वर्ष लोकोत्सव समितीतर्फे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना निमंत्रक वसंतराव मुळीक यांनी मागण्यांचे निवेदन दिले.

**कोल्हापूर :** छत्रपती महाराणी ताराबाई यांच्या ३५० व्या जयंती वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठात ताराराणींच्या जीवन चरित्रावर आंतरराष्ट्रीय स्तरावरील इतिहास परिषद घेऊ, असे आश्वासन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी दिले. छत्रपती महाराणी ताराबाई ३५० वी जयंती वर्ष लोकोत्सव समितीच्यावतीने डॉ. शिर्के यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

**३५०**
व्या जयंती वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठात परिषद होणार

विद्यापीठाने ताराबाई यांच्या ३५० व्या जयंती वर्षी विविध कार्यक्रम आयोजित करावेत, ताराराणींच्या जीवन चरित्रावर राष्ट्रीय स्तरावर इतिहास परिषद घ्यावी, ताराबाई यांच्या संघर्षमय जीवन चरित्राचा इंग्रजी व हिंदी भाषांमध्ये अनुवाद करावा, विदेशी भाषा अध्यापनात अनुवादासाठी चरित्रात्मक भाग समाविष्ट करावा, ताराबाई यांचा इतिहास बी.ए. व एम.ए. इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करावा, सर्व महाविद्यालयांमध्ये छत्रपती ताराबाई यांच्यावर व्याख्याने आयोजित करावीत, सर्वोच्च गुण मिळवणाऱ्या विद्यार्थिनीला ताराराणी पुरस्काराने दीक्षान्त समारंभात सन्मानित करावे, विद्यापीठातील एका विद्यार्थिनी वसतिगृहास ताराबाई यांचे नाव द्या, ताराराणी यांचे व्यवस्थापन, युद्धनीती यावर सर्टिफिकेट कोर्स किंवा डिप्लोमा सुरू करावा, अशा मागण्या केल्या. यावेळी समितीचे निमंत्रक वसंतराव मुळीक, प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डी. आर. मोरे, विष्णू खाडे, शशिकांत पाटील, प्राचार्य डॉ. विद्या साळोखे, ॲड. अजित पाटील, ॲड. अभिषेक मिठारी, महेश मछले, सोमनाथ घोडेराव, सी. एम. गायकवाड, प्रल्हाद जाखले, शिवाजी मोरे, राजू चव्हाण, शंकरराव शेळके, संयोगिता देसाई, प्रकाश पाटील, अजित इंगळे, राम तुपे, अनिल साळोखे, अवधूत पाटील उपस्थित होते.

14 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ताराराणींच्या जीवनावर राष्ट्रीय परिषद घ्या

## छत्रपती महाराणी ताराराणी जयंती लोकोत्सव समितीचे कुलगुरूंना मिवेदन

प्रतिनिधी

कोल्हापूर·

शिवाजी विद्यापीठांमध्ये महाराणी ताराराणी जीवन चरित्रावर राष्ट्रीय स्तरावर इतिहास परिषद व्हावी. महाराणी ताराराणी यांच्या संघर्षमय जीवन चरित्राचा इंग्रजी व हिंदी भाषांमध्ये त्याच बरोबर विद्यापीठ विदेशी भाषा विभागात शिकवण्यात येणाऱ्या विदेशी भाषामध्ये अनुवाद करण्यात यावा. तसेच विदेशी भाषा अध्यापनात अनुवादासाठी चरित्रात्मक भाग समाविष्ट करण्यात यावा. यासह अन्य मागण्यांचे निवेदन छत्रपती महाराणी ताराराणी ३५० जयंती वर्ष लोकोत्सव समितीने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना दिले. तसेच बैठकी दरम्यान अनेक विषयांवर चर्चा केली. यावर राष्ट्रीय परिषद घेण्याचे आश्वासन कुलुगरू शिर्के यांनी दिले.

निवेदनात म्हटले आहे, महाराणी ताराबाई यांचा इतिहास बी. ए. व एम. ए. इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करावा. विद्यार्थीनींसाठी विविध गुणवत्ता शिष्यवृत्ती आहेत. त्या पैकी एकास महाराणी ताराराणी यांचे नाव द्यावे. शिवाजी विद्यापीठ संलग्न सर्व महाविद्यालयांमध्ये छत्रपती ताराबाई यांच्या ३५० जयंती वर्षानिमित्त व्याख्याने आयोजित करण्यात यावीत. विद्यापीठाच्या सर्व विद्यार्थीनीमधून सर्वोच्च गुण मिळवणाऱ्या विद्यार्थिनीला महाराणी ताराराणी पुरस्काराने विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात सन्मानित करण्यात यावे. विद्यापीठातील एका विद्यार्थिनी वसतिगृहास महाराणी ताराबाई यांचे नाव देण्यात यावे. महाराणी ताराराणी यांचे व्यवस्थापन अणि युद्धनीती यावर इतिहास विभागात किंवा अन्य अध्यासनमध्ये सर्टिफिकेट कोर्स किंवा डिप्लोमा सुरु करावा. स्वराज्य टिकवण्यासाठी महाराणी ताराराणी यांनी लढा दिला. महाराणी ताराराणी यांचा अनभिज्ञ व संघर्षमय इतिहास जगासमोर येण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा, यासह अन्य मागण्यांचे निवेदन कुलगुरू डॉ. शिर्के यांना देण्यात आले.

यावेळी मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष वसंतराव मुळीक, माजी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, विष्णू खाडे, शशिकांत पाटील, प्राचार्य डॉ. विद्या साळोखे, अजित पाटील, ॲड. अभिषेक मिठारी, महेश मछले, सोमनाथ घोडेराव, सी. एम. गायकवाड, प्रल्हाद जाखले, शिवाजी मोरे, राजू चव्हाण, शंकरराव शेळके, संयोगिता देसाई, प्रकाश पाटील, अजित इंगळे, राम तुपे, अनिल साळोखे, अवधूत पाटील आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या जीवन चरित्रावर राष्ट्रीय परिषद घ्या, या मागणीचे निवेदन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना देताना वसंतराव मुळीक. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पाटील, डॉ. मोरे, डॉ. शिंदे, शशिकांत पाटील, गायकवाड आदी.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2025

तरुण भारत

# स्पोर्टस् कॉम्प्लेक्स प्रस्तावाला मान्यता द्या

- केंद्रीय युवक कल्याण व खेल राज्य मंत्री रक्षा खडसे यांना निवेदन



कोल्हापूर : मागणीचे निवेदन केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांना निवेदन देताना ॲड स्वागत परूळेकर, डॉ. रघुनाथ ढमकले.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात इनडोअर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारण्यासाठीचा प्रस्ताव ११ डिसेंबर २०२३ ला केंद्र सरकारकडे पाठवला आहे. या प्रस्तावातील तृटींची पुर्तता करीत १२ मार्च २०२४ रोजी पुन्हा नव्याने प्रस्ताव पाठवला आहे. तरी या प्रस्तावाला मंजुरी देवून २० कोटी रूपयांचे अनुदान द्यावे, या मागणीचे निवेदन शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य स्वागत परूळेकर व डॉ. रघुनाथ ढमकले यांनी केंद्रीय युवक कल्याण व खेल मंत्री रक्षा खडसे यांना दिले.

निवेदनात म्हटले आहे, शिवाजी विद्यापीठात इनडोअर स्पोर्टस् कॉम्प्लेक्स व्हावे, यासाठी शिवाजी विद्यापीठ प्रशासक २०२३ पासून केंद्र सरकारकडे पाठपुरावा करीत आहे. सुरूवातीला पाठवलेल्या प्रस्तावात काही तृटी काढण्यात आल्या, या तृटींची पुर्तता करून नव्याने प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. विद्यार्थी हिताचा निर्णय घेवून हा प्रस्ताव मंजूर करून अनुदान द्यावे. जेणेकरून शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंना सर्व प्रकारच्या सुविधा मिळतील. यावर मंत्री खडसे यांनी या प्रस्तावाला मंजुरी देण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन दिले.

तरुण भारत संवाद
विद्यापीठातून

14 FEB 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कर्करोगाच्या पेशींची वाढ थांबणार

## शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक-विद्यार्थ्यांचे स्तनाच्या कॅन्सरवर संशोधन; संशोधनाला जर्मन पेटंट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी स्तनाच्या कर्करोगावरील उपचारांच्या अनुषंगाने केलेल्या नावीन्यपूर्ण संशोधनास जर्मन सरकारचे पेटंट प्राप्त झाले. या संशोधन कार्यात रसायनशास्त्रज्ञ डॉ. शंकर हांगिरगेकर यांच्यासह डॉ. नवनाथ वळेकर आणि संशोधक विद्यार्थी अक्षय गुरव, ललित भोसले यांनी सहभाग घेतला.

बायोमासमधील नैसर्गिक घटकांचा वापर करून फुरफुराल हा घटक वेगळा करून हायड्राझिनिल थायाझोल हे संयुग बनविण्यात संशोधनांतर्गत यश आले. हे संयुग स्तनाच्या कर्करोगावरील आधुनिक आणि प्रभावी उपचारांसाठी मोलाचे



ठरणार आहे.

या संशोधकांनी विकसित केलेल्या संयुगामुळे स्तनाच्या कर्करोगाच्या पेशींची वाढ थांबवणे शक्य होणार असून पारंपरिक उपचार पद्धतीच्या दुष्परिणामांना आळाही बसेल. संशोधनाबद्दल कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे व रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनावणे यांनी संशोधक चमूचे अभिनंदन केले.



शंकर हांगिरगेकर



नवनाथ वळेकर



अक्षय गुरव



ललित भोसले

### उपचार पद्धती अधिक प्रभावी, सुरक्षित

१ आजच्या जीवन शैलीमुळे स्त्रियांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचा धोका अधिकच वाढत चालल्याने यामुळे मृत्यूदरही अधिक आहे. सध्या या कर्करोगाच्या उपचारासाठी शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिओथेरपी, हार्मोनथेरपी, इम्युनोथेरपी अशा विविध प्रकारच्या उपचार पद्धती वापरात आहेत;

२ परंतु या पद्धतींमध्ये रुग्णाला उपचारादरम्यान होणाऱ्या दुष्परिणामांना (साइड इफेक्ट्स) सामोरे जावे लागते. या संशोधनामुळे स्तनाच्या कर्करोगावरील उपचार पद्धती अधिक प्रभावी आणि सुरक्षित होण्यास मदत होणार आहे, असे डॉ. हांगिरगेकर यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2025

सकाळ

# स्तन कर्करोगावरील उपचार संशोधनाला जर्मनीचे पेटंट

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी स्तनाच्या कर्करोगावरील उपचारांच्या अनुषंगागने केलेल्या नावीन्यपूर्ण संशोधनास जर्मन सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. या संशोधन कार्यात रसायनशास्त्रज्ञ डॉ. शंकर हांगिरगेकर, डॉ. नवनाथ वळेकर, संशोधक विद्यार्थी अक्षय गुरव, ललित भोसले यांनी सहभाग घेतला. या संशोधकांनी विकसित केलेल्या संयुगामुळे स्तनाच्या कर्करोगाच्या पेशींची वाढ थांबवणे शक्य होणार आहे. या कर्करोगाच्या उपचारासाठी शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिओथेरपी, हार्मोनथेरपी, इम्युनोथेरपी अशा विविध प्रकारच्या उपचार पद्धती वापरात आहेत. परंतु या पद्धतींमध्ये रुग्णाला उपचारादरम्यान होणाऱ्या दुष्परिणामांना (साईड इफेक्ट्स) सामोरे जावे लागते. या संशोधनामुळे स्तनाच्या कर्करोगावरील उपचार पद्धती अधिक प्रभावी आणि सुरक्षित होण्यास मदत होणार आहे, असे डॉ. हांगिरगेकर यांनी सांगितले.

डॉ. हांगिरगेकर, गुरव आणि भोसले यांनी ग्राइंडस्टोन केमिस्ट्री वापरुन बायोमासपासून हायड्रॉक्झी मिथाईल फुरफुराल या मूलद्रव्यापासून नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुग तयार करण्याच्या शोधलेल्या पद्धतीला संयुक्त राष्ट्रांचे (यूके) पेटंट प्राप्त झाले आहे. त्यापुढील टप्पा म्हणजे हे स्तनाच्या कर्करोगावरील त्याचे उपयोजन ठरले आहे.

14 FEB 2025

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्तनाच्या कर्करोगावरील संशोधनाला जर्मन पेटंट

## डॉ. शंकर हांगिरगेकर, डॉ. नवनाथ वळेकर, अक्षय गुरव, ललित भोसले यांची कामगिरी



डॉ. हांगिरगेकर डॉ. नवनाथ वळेकर अक्षय गुरव ललित भोसले

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी स्तनाच्या कर्करोगावरील उपचारांच्या अनुषंगागने केलेल्या नाविन्यपूर्ण संशोधनास जर्मन सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. या संशोधनात रसायनशास्त्रज्ञ डॉ. शंकर हांगिरगेकर यांच्यासह डॉ. नवनाथ वळेकर आणि संशोधक विद्यार्थी अक्षय गुरव, ललित भोसले यांनी सहभाग घेतला.

बायोमासमधील नैसर्गिक घटकांचा वापर करून फुरफुराल हा घटक वेगळा करून हायड्राझिनिल थायाझोल हे संयुग बनविण्यात संशोधनांतर्गत यश आले. हे संयुग स्तनाच्या कर्करोगावरील आधुनिक आणि प्रभावी उपचारांसाठी मोलाचे ठरणार आहे. या संशोधकांनी विकसित केलेल्या संयुगामुळे स्तनाच्या कर्करोगाच्या पेशींची वाढ थांबवणे शक्य होणार असून पारंपरिक उपचार पद्धतीच्या दुष्परिणामांना आळाही बसेल. जीवन शैलीमुळे स्त्रियांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचा धोका अधिकच वाढत चालल्याने यामुळे मृत्यूदरही अधिक आहे. सध्या या कर्करोगाच्या उपचारासाठी शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिओथेरपी, हार्मोनथेरपी, इम्युनोथेरपी अशा विविध प्रकारच्या उपचार पद्धती वापरात आहेत. परंतु या पद्धतींमध्ये रूग्णाला उपचारादरम्यान होणाऱ्या दुष्परिणामांना (साईड इफेक्ट्स) सामोरे जावे लागते. या संशोधनामुळे स्तनाच्या कर्करोगावरील उपचार पद्धती अधिक प्रभावी आणि सुरक्षित होण्यास मदत होणार आहे, असे डॉ. हांगिरगेकर यांनी सांगितले.

गतवर्षी डॉ. हांगिरगेकर, गुरव आणि भोसले यांनी ग्राइंडस्टोन केमिस्ट्री वापरुन बायोमासपासून हायड्रॉक्झी मिथाईल फुरफुराल या मूलद्रव्यापासून नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुग तयार करण्याच्या शोधलेल्या पद्धतीला संयुक्त राष्ट्रांचे (यूके) पेटंटही प्राप्त झाले आहे. त्यापुढील टप्पा म्हणजे हे स्तनाच्या कर्करोगावरील त्याचे उपयोजन ठरले आहे. या संशोधनाबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरू डॉ.पी. एस.पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनावणे यांनी संशोधकांचे अभिनंदन केले आहे.

14 FEB 2025 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्तनाच्या कर्करोगावरील संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठातील चौघांना जर्मन पेटंट

## डॉ. हांगिरगेकर, डॉ. वळेकर, अक्षय गुरव, ललित भोसले यांची कामगिरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी स्तनाच्या कर्करोगावरील उपचारांच्या अनुषंगाने केलेल्या नावीन्यपूर्ण संशोधनास जर्मन सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. रसायनशास्त्रज्ञ डॉ. शंकर हांगिरगेकर यांच्यासह डॉ. नवनाथ वळेकर आणि संशोधक विद्यार्थी अक्षय गुरव, ललित भोसले यांनी ही कामगिरी केली आहे.

बायोमासमधील नैसर्गिक घटकांचा वापर करून फुरफुराल हा घटक वेगळा करून हायड्राझिनिल थायाझोल हे संयुग बनविण्यात यश आले. हे संयुग स्तनाच्या कर्करोगावरील प्रभावी उपचारांसाठी मोलाचे ठरणार आहे.


डॉ. शंकर हांगिरगेकर


डॉ. नवनाथ वळेकर


अक्षय गुरव


ललित भोसले

संशोधकांनी विकसित केलेल्या संयुगामुळे स्तनाच्या कर्करोगाच्या पेशींची वाढ थांबवणे शक्य होणार असून, पारंपरिक उपचार पद्धतीच्या दुष्परिणामांना आळाही बसेल. सध्या या कर्करोगाच्या उपचारासाठी शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिओथेरपी, हार्मोनथेरपी, इम्युनोथेरपी अशा विविध प्रकारच्या उपचार पद्धती वापरात आहेत. परंतु, या पद्धतींमध्ये रुग्णाला उपचारादरम्यान होणाऱ्या दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. या संशोधनामुळे स्तनाच्या कर्करोगावरील उपचार पद्धती अधिक प्रभावी आणि सुरक्षित होण्यास मदत होणार आहे, असे डॉ. हांगिरगेकर यांनी सांगितले. संशोधनाबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनावणे यांनी संशोधकांचे अभिनंदन केले आहे.

14 FEB 2025 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील संशोधकांना जर्मन पेटंट

## डॉ. शंकर हांगिरगेकर, डॉ. नवनाथ वळेकर, अक्षय गुरव, ललित भोसले यांची कामगिरी


डॉ. शंकर हांगिरगेकर


डॉ. नवनाथ वळेकर


अक्षय गुरव


ललित भोसले

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी स्तनाच्या कर्करोगावरील उपचारांच्या अनुषंगाने केलेल्या नावीन्यपूर्ण संशोधनास जर्मन सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. या संशोधन कार्यात रसायनशास्त्रज्ञ डॉ. शंकर हांगिरगेकर यांच्यासह डॉ. नवनाथ वळेकर आणि संशोधक विद्यार्थी अक्षय गुरव, ललित भोसले यांनी सहभाग घेतला.

या संशोधनासंदर्भात डॉ. हांगिरगेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, बायोमासमधील नैसर्गिक घटकांचा वापर करून फुरफुराल हा घटक वेगळा करून हायड्राझिनिल थायाझोल हे संयुग बनवण्यात संशोधनांतर्गत यश आले. हे संयुग स्तनाच्या कर्करोगावरील आधुनिक आणि प्रभावी उपचारांसाठी मोलाचे ठरणार आहे. या संशोधकांनी विकसित केलेल्या संयुगामुळे स्तनाच्या कर्करोगाच्या पेशींची वाढ थांबवणे शक्य होणार असून, पारंपरिक उपचार पद्धतीच्या दुष्परिणामांना आळाही बसेल. आजच्या जीवनशैलीमुळे स्त्रियांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचा धोका अधिकच वाढत चालल्याने यामुळे मृत्यूदरही अधिक आहे. सध्या या कर्करोगाच्या उपचारासाठी शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिओथेरपी, हार्मोनथेरपी, इम्युनोथेरपी अशा विविध प्रकारच्या उपचार पद्धती वापरात आहेत; परंतु या पद्धतींमध्ये रुग्णाला उपचारादरम्यान होणाऱ्या दुष्परिणामांना (साईड इफेक्टस्) सामोरे जावे लागते. या संशोधनामुळे स्तनाच्या कर्करोगावरील उपचारपद्धती अधिक प्रभावी आणि सुरक्षित होण्यास मदत होणार आहे, असे डॉ. हांगिरगेकर यांनी सांगितले. गतवर्षी डॉ. हांगिरगेकर, गुरव आणि भोसले यांनी ग्राईंडस्टोन केमिस्ट्री वापरून बायोमासपासून हायड्रॉक्झी मिथाईल फुरफुराल या मूलद्रव्यापासून नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुग तयार करण्याच्या शोधलेल्या पद्धतीला संयुक्त राष्ट्रांचे (यूके) पेटंटही प्राप्त झाले आहे. त्यापुढील टप्पा म्हणजे हे स्तनाच्या कर्करोगावरील त्याचे उपयोजन ठरले आहे.

संशोधनाबद्दल कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे व रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनावणे यांनी संशोधक चमूचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2025
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी आयोजित अटल टिंकरिंग स्कूलसच्या प्रकल्प सादरीकरणात सहभागी शालेय विद्यार्थ्यांकडून त्यांच्या प्रकल्पाविषयी जाणून घेताना शिक्षक.

# अटल टिंकरिंग स्कूलसचे शिवाजी विद्यापीठात प्रदर्शन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : विज्ञान प्रकल्पाविषयी अत्यंत गांभीर्याने माहिती सांगणारे शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि तितक्याच गांभीर्याने त्याचे म्हणणे ऐकून घेणारे, त्याला प्रश्न विचारणारे महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी. त्यात काही शिक्षकही सहभागी, असे विज्ञानाप्रती सजगता दर्शविणारे चित्र आज शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात पाहावयास मिळाले. निमित्त होते विद्यापीठ, जिल्हा परिषद आणि पुण्याच्या लेंड अ हँड इंडियातर्फे आयोजित अटल टिंकरिंग स्कूलसच्या प्रकल्प सादरीकरण, प्रदर्शनाचे!

प्रदर्शनात १३० अटल टिंकरिंग शाळांनी १८० प्रकल्पांचे सादरीकरण केले. त्यात ५४० अधिक विद्यार्थी, शिक्षक सहभागी झाले. या प्रकल्पातील निवडक प्रकल्पांचे उद्या, शुक्रवारी होणाऱ्या शिक्षण, उद्योग आणि शासन परिषदेमध्ये सादरीकरण होणार आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पांमध्ये स्मार्ट शेतीपासून स्मार्ट गोठ्यापर्यंत आणि स्मार्ट शाळेपासून ते स्मार्ट घरापर्यंत प्रत्येक प्रकल्पाचा समावेश होता.

> शालेय विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना योग्य संधी मिळाल्यास त्यांच्यातील सर्जनशीलतेची प्रचिती आल्याशिवाय राहात नाही, हे आजच्या प्रदर्शनामधून सिद्ध झाले.
> **- डॉ. पी. एस. पाटील**, प्र-कुलगुरू

दरम्यान, लेंड अ हँड इंडियातर्फे 'स्कील्स ऑन व्हील्स' हे वाहन मांडले होते. त्यात सर्व प्रकारच्या कौशल्यांसाठी लागणारी बहुविध उपकरणे, औजारे यांची मांडणी केली होती. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते प्रदर्शनातील विजेत्या शाळांना पारितोषिक वितरण करण्यात आले. नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, लेंड अ हँड इंडियाचे अध्यक्ष मिलिंद माने, अरुंधती जाधव उपस्थित होते.

14 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विद्यार्थ्यांकडून प्रकल्पांचे सादरीकरण

## शिक्षकांसह महाविद्यालयीन विद्यार्थीही प्रभावित : शिवाजी विद्यापीठात १८० प्रकल्प सादर

प्रतिनिधी
कोल्हापूर

विज्ञान प्रकल्पाविषयी अत्यंत गांभीर्याने माहिती सांगणारे शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि तितक्याच गांभीर्याने त्याचे म्हणणे ऐकून घेणारे, त्याला प्रश्न विचारणारे महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षकही सामील झालेले, असे एक अनोखे आणि विज्ञानाप्रती सजगता दर्शविणारे चित्र शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात पाहायला मिळाले. निमित्त होते शिवाजी विद्यापीठ, जिल्हा परिषद आणि पुण्याच्या लेंड अ हँड इंडिया यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या अटल टिंकरिंग स्कूलच्या प्रकल्प सादरीकरण व प्रदर्शनाचे.

शिवाजी विद्यापीठात १३० अटल टिंकरिंग स्कूलसकडून १८० प्रकल्पांचे सादरीकरण केले. यामध्ये ५४० हून अधिक विद्यार्थी, शिक्षक सहभागी झाले. या प्रकल्पातील निवडक प्रकल्पांचे आज (दि. १४) रोजी होणाऱ्या परिषदेमध्ये पुनश्च सादरीकरण होणार आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित अटल टिंकरिंग स्कूलच्या प्रकल्प सादरीकरणात सहभागी शालेय विद्यार्थ्यांकडून त्यांच्या प्रकल्पाविषयी माहिती घेताना महाविद्यालयीन विद्यार्थिनी.

### प्रदर्शनस्थळी लक्षवेधी 'स्कील ऑन व्हील्स'

लेंड अ हँड इंडियाच्या वतीने 'स्कील्स ऑन व्हील्स' हे वाहन प्रदर्शनाच्या सुरुवातीलाच उभे केले होते. सर्व प्रकारच्या कौशल्यांसाठी लागणारी बहुविध उपकरणे, औजारे यांची मांडणी आकर्षक पद्धतीने केली होती. यावेळी नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, लेंड अ हँड इंडियाचे चेअरमन मिलींद माने यांनीही मनोगत व्यक्त केले. अरुंधती जाधव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विजेत्या शाळांना पारितोषिक वितरण केले.

### शालेय विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेची प्रचिती

शालेय विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना योग्य संधी मिळाल्यास त्यांच्यातील सर्जनशीलतेची प्रचिती आल्याशिवाय राहात नाही, हे या प्रदर्शनातून सिद्ध झाले, असे गौरवोद्गार प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रदर्शनाच्या पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानावरुन काढले. नवसंकल्पनांवर आधारित प्रकल्प विद्यार्थ्यांनी सादर केले, त्यामधून एक तरी पेटंट प्राप्त व्हावे, अशी अपेक्षा आहे.

या प्रदर्शनामध्ये शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पांमध्ये स्मार्ट शेतीपासून स्मार्ट गोठ्यापर्यंत आणि स्मार्ट शाळेपासून ते स्मार्ट घरापर्यंतच्या प्रकल्पांचा समावेश होता. शेतीविषयक उपकरण, परिसर संरचनेचे डिझाईन, सुतारकाम, रोबोटिक्ससह इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रीकल, मॅकेनिकल अभियांत्रिकीच्या पाऊलखुणा या विद्यार्थ्यांच्या कामामध्ये दिसून आल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आजपासून शिक्षण, उद्योग व शासन परिषद

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठामधील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. १४ व शनिवार, दि. १५ फेब्रुवारी या कालावधीमध्ये 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०'चे आयोजन केले आहे. विकसित भारत २०४७ साठी नवोपक्रम आणि स्टार्टअप या विषयावर ही परिषद होत आहे. याकरिता देशभरातील विविध विद्यापीठे, उद्योग व शासनाच्या संलग्नित विभागांतील मान्यवर सहभागी होणार आहेत, अशी माहिती प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. पाटील म्हणाले, परिषदेमध्ये स्टार्टअपची संकल्पना, महत्त्व, त्यातील स्वयंरोजगार व रोजगार निर्मिती तसेच शासन व वित्तीय संस्थांकडून मिळणारी आर्थिक व इतर मदत, स्टार्टअपना विविध क्षेत्रांत उपलब्ध असलेल्या संधी, शासनाचे सहाय्य, या क्षेत्रासमोरील आव्हाने, बदलते तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन



करण्यात येणार आहे.

परिषदेचे उद्घाटन आयआयटी कानपूरचे माजी संचालक प्रा. संजय धांडे यांच्या हस्ते शुक्रवारी होणार आहे. यानंतर उद्योजक आनंद देशपांडे, ऋषीकेश धांडे हे 'व्यावसायिक आयुष्याची तयारी' या विषयावर तर ज्येष्ठ उद्योजक रामदास माने-पुणे हे 'उद्योजक घडण्यामागची प्रक्रिया' याविषयी मार्गदर्शन करणार आहेत.

शनिवारी बारामती अ‍ॅग्रो ट्रस्टचे तज्ज्ञ डॉ. संतोष कारंजे हे 'कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर' यावर विचार व्यक्त करतील. यानंतर गोरे उद्योग समूह-अमेरिका या संस्थेच्या संस्थापिक व संचालिका विनया गोरे आणि सरदार पटेल विद्यापीठ-आणंद, गुजरात येथील डॉ. सौरभ सोनी मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठात आज परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामधील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र व एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४ व दि. १५ रोजी 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०'चे आयोजन केले आहे.

याकरिता देशभरातील विविध विद्यापीठे, उद्योग व शासनाच्या संलग्नित विभागातील मान्यवर मंडळी सहभागी होत आहेत, अशी माहिती प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2025

तरुण भारत

# विद्यापीठात रविवारपासून राष्ट्रीय एकात्मता शिबिर

कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठात येत्या १६ ते २२ फेब्रुवारी या कालावधीत राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिरात १२ राज्यांतील २१ विद्यापीठांतील एन.एस.एस. स्वयंसेवक सहभागी होणार आहेत, अशी माहिती राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी दिली आहे. पुणे येथील राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित केले आहे. रविवारी १६ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता या शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थ भूषवणार आहेत. १२ राज्यांतील २१ विद्यापीठांतून २१० स्वयंसेवक विद्यार्थी–विद्यार्थिनी आणि २१ संघ व्यवस्थापक असे २३१ जण सहभागी होणार आहेत. योगासन, गटचर्चा, शिवजयंतीच्या निमित्त शोभायात्रा, कोल्हापूर जिल्ह्यातील ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांना भेटी, सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, लेझीम व झांज पथक, शिववंदना, मर्दानी खेळ, रस्सीखेच स्पर्धा, वैयक्तिक देशभक्तीपर गीतगायन स्पर्धा, एक दिवसीय श्रमदान केले जाणार आहे. २२ रोजी शिबिरसमारोपप्रसंगी स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2025
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात रविवारपासून राष्ट्रीय एकात्मता शिबिर

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठात रविवार (ता. १६) ते शनिवार (ता. २२) या कालावधीत राष्ट्रीय एकात्मता शिबिर होणार आहे. त्यात महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, आदी बारा राज्यांतील २१ विद्यापीठांतील राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) २१० स्वयंसेवक सहभागी होणार आहेत, अशी माहिती 'एनएसएस'चे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी दिली. पुणे येथील एनएसएस प्रादेशिक संचालनालय आणि विद्यापीठाचा एनएसएस कक्षातर्फे हे शिबिर होणार आहे. विविध राज्यांतील एनएसएसच्या स्वयंसेवकांना एकत्र आणून त्यांच्याद्वारे राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि सांस्कृतिक आदान-प्रदान वृद्धिंगत करण्याचा उद्देश आहे. उद्घाटन रविवारी दुपारी चार वाजता जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते होणार आहे. शनिवारी समारोप समारंभ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2025
पुढारी

# 'व्हॉईस कल्चर'वर आजपासून शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन व दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. १४ व १५ रोजी दोन दिवसीय व्हाईस कल्चर कार्यशाळा आयोजित केली आहे. पीएम उषा योजनेअंतर्गत पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अभ्यासनात ही कार्यशाळा होत आहे. शुक्रवारी सातारा येथील उच्चारशास्त्रतज्ज्ञ तुषार भद्रे, तर दि. १५ रोजी पुणे येथील इएमएमआरसीचे सहयोगी निमति मिलिंद पाटील मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळा सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत होणार असून सर्वांसाठी ती खुली आहे. या कार्यशाळेला उपस्थित राहावे, असे आवाहन पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव व दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्र-संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2025

पुण्यनगरी

# रेडिओत विश्वासार्हता जपा

## आरजे झाहिद

**कोल्हापूर :** रेडिओ हे कायम टिकून राहणारे माध्यम आहे. रेडिओत काम करताना मनोरंजनाबरोबरच विश्वासार्हता जपा, असे आवाहन आरजे झाहिद यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. मास कम्युनिकेशन विभागात रेडिओ दिनानिमित्त 'रेडिओची बोली' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. आरजे झाहिद म्हणाले, रेडिओवर बोलताना आपला आवाज, उच्चार महत्त्वाचा असतो. यासाठी तुमचा आवाज जोपासा. आश्वासक बोलणे ठेवा.

प्रस्ताविकात मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी शिववाणी रेडिओ चॅनेलच्या वतीने घेण्यात येत असलेल्या कार्यक्रमांबाबत माहिती दिली. सूत्रसंचालन कल्याणी अमणगी यांनी केले. पाहुण्यांची ओळख शिववाणी रेडिओचे कार्यक्रम निर्माता अभिषेक पाटील यांनी करून दिली. आभार रोहित भारतीय यांनी मानले. यावेळी श्रोत्यांचे प्रतिनिधी मतीन शेख, माहिती अधिकारी वृषाली पाटील, डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रा. उदय पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील आदी उपस्थित होते.